The Nasik Merchants' Co-operative Bank Ltd., Nashik

नामको बँक
(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)

स्थापना: १९५९

Namco Bank
(Multi - State Scheduled Bank)

RBI LicNo.: MH 978 Dt.12/08/1988 Multi. State Reg. No.: MSCS/CR/113/2000 Dt. 25/10/2000

इतिवृत्त

बँकेची ६७ वी

वार्षिक सर्वसाधारण सभा

शनिवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५

Admin. Office: A-16, Industrial Area, Late Babubhai Rathi Chowk,
Netaji Subhash Chandra Bose Marg, Satpur, Nashik - 422007

Phone No.: 0253 2308200 to 2308206 | Fax: 0253 2353581
E-mail: helpdesk@namcobank.in | Website: www.namcobank.in

इतिवृत्त
बँकेची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा
शनिवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५ चे इतिवृत्त

बँकेची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे प्रशासकीय कार्यालय, ए—१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबुभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक—४२२००७ येथे शनिवार, दि.२०/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजतां बँकेचे अध्यक्ष मा.श्री.हेमंत हरीभाऊ धात्रक यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली. सभेस एकूण ६५८ सभासद हजर होते.

सभेचा वृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

सर्व प्रथम बँकेचे अध्यक्ष मा.श्री.हेमंत हरीभाऊ धात्रक यांनी सर्वांचे स्वागत करुन सभेस उपस्थित राहिल्याबदद्ल आभार मानले व बँकेचे संचालक श्री.प्रफुल्ल बुधमल संचेती यांचा रजेचा अर्ज मंजूर करण्यात आला. तसेच निवेदन केले की, आदरणीय व्यासपीठ व उपस्थित सभासद बंधुभगिनींनो सभेची वेळ सकाळी ११.०० वाजताची होती त्यामुळे कोरम पूर्ण झाल्याने सभेच्या कामकाजास रितसर सुरूवात करण्यात येत आहे.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्राम दीक्षित यांनी अहवाल वर्षात जे थोर शास्त्रज्ञ, राजकीय, सामाजिक, सहकार, कला व साहित्यिक क्षेत्रातील कार्यकर्ते, बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार, सेवक, ज्ञात—अज्ञात जे पंचतत्वात विलीन झाले त्यांना सभेने दोन मिनीटे उभे राहुन आपली भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

बँकेचे अध्यक्ष मा.श्री.हेमंत हरीभाऊ धात्रक यांनी ३१ मार्च २०२५ अखेरची ची गुणात्मक व संख्यात्मक प्रगती विविध पैलुंच्या माध्यमातून सादर करून बँकेची आर्थिक परिस्थिती सभेसमोर पुढीलप्रमाणे मांडली व आपले मनोगत व्यक्त करतांना आर्थिक वर्ष २०२४—२५ हे बँकेसाठी अत्यंत चांगले ठरलेले असुन बँकेची सर्वांगीण प्रगती मागील आर्थिक वर्षात झालेली आहे. बँकेच्या ठेवी ३१. ०३.२०२४ रोजी रू.२१८४ कोटी ३८ लाख ४९ हजार होत्या त्यात वाढ होऊन त्या ३१.०३.२०२५ अखेर रू.२४३९ कोटी ५६ हजार इतक्या झालेल्या आहेत त्यात रू.२५४ कोटी ६२ लाख ७ हजार इतक्या रकमेने वाढ झालेली असुन ती वाढ ११.६५% इतकी आहे. बँकेचे ठेवीवरील व्याजदर हे आकर्षक असुन कासा ठेवींचे प्रमाण देखील ३५.१३% इतके आहे. बँकेचे कर्ज ३१.०३.२०२४ रोजी रू.१०३९ कोटी ६० लाख ६४ हजार होते त्यात वाढ होऊन ते ३१.०३.२०२५ अखेर रू.१३२२ कोटी २४ लाख ६ हजार इतके झालेले आहे त्यात रू.२८२ कोटी ६३ लाख ४२ हजार इतक्या रकमेने वाढ झालेली असुन ती वाढ २७.१८% इतकी आहे. कर्जात झालेली वाढ ही कर्जात येणारी वसुली गृहीत धरून असते. बँकेने आर्थिक वर्ष २०२४—२५ मध्ये रू.४६२ कोटी ५० लाख इतक्या रकमेचे प्रत्यक्ष कर्ज वाटप केलेले आहे. बँकेने जनसामान्यांना केंद्र बिंदू मानून अतिशय माफक व्याज दरात विविध कर्ज योजना तयार केलेल्या असुन त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा अशी मी आपणास विनंती करतो. तसेच इतके वाटप होऊनही एनपीए चे प्रमाण हे देखील मागील वर्षाच्या तुलनेत कमी होऊन ढोबळ एनपीए ६.४४% वरून ४.४०% इतका झालेला आहे तर निव्वळ एनपीए ०% आहे. बँकेने आर्थिक वर्ष २०२४—२५ मध्ये रू.४१ कोटी ८० लाख ९८ हजार इतका निव्वळ नफा मिळविला आहे. एकंदरीत आर्थिक वर्ष २०२४—२५ मध्ये बँकेची सर्वांगिण प्रगती झालेली असल्याचे दिसून येते.

इतक्या चांगल्या प्रकारे वाटचाल सुरू असतांना निवडणूकीचे काळात बँकेच्या मालेगांव शाखेत काही तरूणांनी उघडलेल्या खात्याचे बाबतीत गैर प्रकार झाल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या व बँकेची बदनामी करण्याचा प्रयत्न झाला. मालेगांव शहरातील व देशातील विविध बँकांमध्ये सदर व्यक्तींची खाते व व्यवहार आढळूनही फक्त आपल्या बँकेचे नाव बातम्यांमध्ये येत राहिले हे अत्यंत खेदकारक होते. मात्र अशा परिस्थितीतही बँकेने केवायसी पुर्तता योग्य प्रकारे केलेली असल्याने बँकेस कोणताही त्रास झाला नाही.

बँकेने सातत्याने ग्राहकाभिमुख निर्णय घेतलेले असुन फ्रँन्किंग, लॉकर्स, पॉज मशिन, क्युआर कोड, मोबाईल बँकिंग अशा सोयी सुविधा बँक सातत्याने ग्राहकांना देत असुन त्या अधिक प्रभावीपणे देण्यासाठी बँक प्रयत्नशील आहे. हे करत असतांना बँकेने सेवक प्रशिक्षणावरही भर दिलेला असुन सातत्याने बँक सेवक प्रशिक्षण कार्यक्रम राबवत असते. बँकेने सेवकांसाठी देखील प्रोत्साहन देण्यासाठी ठेवी, कर्ज, एनपीए याची उद्दिष्टे देऊन उत्कृष्ट शाखा, उत्कृष्ट शाखाधिकारी अशी पारितोषिके दिलेली आहेत. बँकेने सेवकांचे हिताचे दृष्टिने सर्व सेवकांना मेडिक्लेम व जीवन विमा उतरवून देऊन संरक्षित केलेले आहे.

मागील वर्षातील व्यवसाय वृध्दीसोबतच विशेष उल्लेख करावयाच्या गोष्टी म्हणजे बँकेस बँकिंग फ्रंटीयर्स बेस्ट कम्प्लायन्स ट्रान्सफॉर्मेशन पुरस्कार, महाराष्ट्र को ऑपरेटीव्ह बँक फेडरेशन तर्फे बेस्ट बँक पुरस्कार, फाऊंडर मेडियातर्फे घेण्यात आलेल्या भारत रत्न सहाकारीता सन्मान सर्वोत्कृष्ट

मल्टि स्टेट को ऑपरेटीव्ह बँक पुरस्कार तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्राम दीक्षित यांना सर्वोत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी पुरस्कार आदी पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दीक्षित यांचे नाव सर्व बँकांचे लिडर्समध्ये पहिल्या ५० नावांमध्ये आहे असे मिळालेले सर्व पुरस्कार हे बँकेच्या प्रगतीचे द्योतक आहेत. तसेच बँकेचे संचालक मंडळ व सर्व सेवक हे एकत्रितपणे बँकेच्या प्रगतीचा ध्यास घेऊन काम करीत आहेत असेच दर्शवितात. मी आपणास आपल्या गरजेनुसार बँकेच्या विविध सेवा सुविधांचा लाभ घ्यावा, भारतीय रिझर्व्ह बँकेचे केवायसी बाबतचे निर्देशांनुसार आपण केवायसी पुर्तता केली नसल्यास आपले खाते गोठविले जाते व असे होऊ नये म्हणुन नजिकच्या शाखेत जाऊन त्वरीत केवायसी पुर्तता करून दयावी असे आवाहन करतो.

आपली बँक गेली ३ वर्ष सातत्याने नासिककरांच्या सेवेत वाहन मेळाव्याचे आयोजन करून नासिककरांना एकाच छत्राखाली सर्व कंपनीची वाहने पाहण्यासाठी व त्वरीत कर्ज सुविधा उपलब्ध करून देत आहे. त्याचप्रमाणे यावर्षी देखील बँकेने २६,२७ व २८ सप्टेंबर २०२५ रोजी डोंगरे वस्तीगृह मैदान गंगापूर रोड येथे वाहन मेळावा आयोजित केलेला आहे तेथे सर्वांनी उपस्थिती लाऊन सुविधेचा लाभ घ्यावा. तसेच आपल्या बँकेत सोने तारण कर्जाचे बाबतीत भारतीय रिझर्व्ह बँकेचे नवीन धोरण नुसार बँक दिनांक ०३.१०.२०२५ रोजी पासुन सोने कर्जाच्या नवीन कर्ज योजना करून रू.२.५० लाखापर्यंतचे मूल्यांकनाचे ८५%, रू.२.५० लाखांचे पुढील व रू.५.०० लाखांपर्यंतचे कर्ज ८०% व रू. ५.०० लाखांचे वरील कर्ज ७५% पर्यंत देऊ शकणार आहे. तसेच रू.२.५० लाखांचे कर्जाचे नुतनीकरण करता येणार आहे. हाऊसिंग सोसायटी व ट्रस्ट यासाठी बँकेने करंट खात्यांसाठी स्वीप इन स्वीप आऊट म्हणजेच खात्यात रू.२५०००/— रक्कम ठेऊन त्यावरील रक्कम कायम मुदत ठेवीत वर्ग होऊन त्यावर व्याज मिळणार आहे. तरी सर्व सेवांचा आपण लाभ घ्यावा असे मी आपणास आवाहन करतो.

एकटे आपण काहीतरी करू शकतो पण आपण सगळे मिळून खूप काही करू शकतो. व्यक्तिगत रूपात आपण एक थेंब आहोत पण एकत्र येऊन मिसळलो तर त्याचा महासागर बनू शकतो. हे लक्षात ठेऊन एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या उक्ती नुसार नामको बँक परिवार अधिक वृध्दिंगत करूयात असे आवाहन करतो व माझे मनोगत थांबवितो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

वरील प्रमाणे मनोगताचे वाचन झाल्यानंतर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दीक्षित यांनी अध्यक्षांचे आभार मानले व सभेच्या कामकाजास रितसर सुरूवात करण्यात आली.

अहवालातील पुढील प्रमाणे मुद्रण दोष दुरूस्तीचे व विषयपत्रिकेचे वाचन बँकेचे सरव्यवस्थापक श्री.त्रिगुण कुलकर्णी यांनी केले.

अ.क्र.	पान नं.	दुरुस्ती
१	०४	२५% राखीव निधी :— २६,१३,५७,८०३/— ऐवजी २५% राखीव निधी :— १०,४५,२४,७४०/— + शिल्लक नफा :— १५,६८,३३,०६३/— असे एकूण २६,१३,५७,८०३/— असे वाचावे
२	१८	सिबील/सरसाई चार्जेस ३१.०३.२०२५ रू. ०० (शुन्य) ऐवजी रू. २७,२६,१६४/— असे वाचावे
३	२९	Classification of Advances and Provision Held Sub Standard e/;s -4470.53 दर्शविले आहे. त्यामधील वजा (—) चिन्ह ग्राहय धरू नये.

सर्वप्रथम या आर्थिक वर्षात बँकेने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबाबत मिळालेल्या विविध पारितोषिकांबद्दल संचालक व सेवकांच्या अभिनंदनाचा ठराव करण्याचे सभासद कातड पाटील यांनी सुचविले त्यास सर्व सभेने एकमताने अनुमोदन देऊन सर्वांचे अभिनंदन केले.

विषय क्र १. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव क्र १. मागील सभा दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजीचे इतिवृत्त सभास्थानी उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे नमुद करून त्याचे वाचन सरव्यवस्थापक श्री.त्रिगुण कुलकर्णी यांनी केले. यावेळी सभासद श्री.पंडीतराव रंगनाथ कातड पाटील यांनी सर्वांना अहवाल व इतिवृत्त मिळाले असुन सदर दोन्ही बाबींना मंजूरी देण्यास हरकत नाही असे सभेस सूचविले त्यावर सभासद श्री.योगेश नंदलाल दायमा यांनी श्री.कातड पाटील यांना अनुमोदन दिले सभासद

श्री.विजय बोरा यांनी यावेळी मागील सभेत मी उपस्थित असतांना उपस्थित यादीत माझे नाव समाविष्ट केलेले नाही असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर खातरजमा करून बँकेचे अध्यक्ष यांनी त्यास उत्तर देतांना श्री.बोरा हे सभेस हजर होते परंतू सभेच्या हजेरी वहीवर त्यांनी सही केलेली नव्हती त्यामुळे त्यांचे नाव त्यात समाविष्ट नाही असा खुलासा केला व हे सर्व श्री.बोरा हे जाणून बुजून दरवर्षी सभेचा वेळ वाया घालविणेकरीता काही तरी प्रश्न उपस्थित करत असतात असे सभेच्या निदर्शनास आणून दिले असता सभासद श्री. कातड पाटील यांनी उगाचच विषयांतर न करता सदर विषयास सर्वांनी मंजूरी दयावी असे सभेस सूचविले त्यावर सभेने मागील इतिवृत्ताला बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री.कातड पाटील पंडीतराव रंगनाथ
अनुमोदक :श्री.दायमा योगेश नंदलाल
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.२ सन २०२४–२०२५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवालाबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र.२ सन २०२४–२०२५ या वर्षाचा अहवाल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दिक्षीत यांनी सभेसमोर मांडला. त्यावर सभासद श्री.धनराज तुळशीराम चौधरी यांनी सदरचा अहवाल सर्व सभासदांना मिळाला असुन वाचण्याची आवश्यकता नसल्याचे सभेस सूचविले त्यावर सभासद श्री.आनंद मोतीलाल ओस्तवाल यांनी श्री.चौधरी यांच्या सुचनेस अनुमोदन दिले त्यावर सर्व सभासदांनी बहुमताने सदर विषयास मंजुरी दिली.

सुचक :श्री.चौधरी धनराज तुळशीराम
अनुमोदक :श्री. ओस्तवाल आनंद मोतीलाल
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.३. दि.३१ मार्च २०२५ अखेरची ऑडिटेड आर्थिकपत्रके, ताळेबंद, नफा–तोटा पत्रक यावर विचार विनीमय करणे व मान्यता देणे.

ठराव क्र ३ दि.३१ मार्च २०२५ अखेरची आर्थिकपत्रके, ताळेबंद, नफा– तोटापत्रक व त्या सोबतची परिशिष्टांची माहिती बँकेचे लेखा विभागप्रमुख श्री.गंगाधर तारगे यांनी सभेला दिली.त्यावर सभासद श्री.भिमराव कोंडाजी जेजुरे यांनी अहवाल सर्वांना भेटलेला असुन अहवालातील पान नं.१० ते १९ वर बँकेची सर्व आर्थिक माहिती दिलेली आहे व ती ऑडीटेड असल्याने योग्यच असेल त्यामुळे सदर विषयास सर्व सभासदांनी मंजुरी देण्यास हरकत नसावी असे सभेस सुचविले त्यावर सभासद श्री.नितीन आव्हाड यांनी पान नं.१२ वरील सेक्शन ३६ नुसार संशयित व बुडीत निधी बद्दल तसेच बँकने केलेल्या तरतुदीत कायदेशीर तफावत असल्याचे निदर्शनास आणुन दिले तसेच पान नं.१४ वरील इतर उत्पन्नात सुध्दा हिशोब चुकला असुन त्यामुळे बँकेला अधिकचा टॅक्स भरावा लागलेला आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सेक्शन ३६ नुसार प्रोव्हिजन व बँकिंग रेगुलेशन ॲक्टनुसार बँकेने त्याचा फायदा घेतलेला आहे व तो कायदयातील नियमाप्रमाणेच आहे व ज्या प्रोव्हिजन टॅक्सेशन साठी आवश्यक होत्या त्याच बँकेने केलेल्या असल्याचे त्यांनी नमूद केले. व त्या नंतर आलेला हा नफा आहे. तसेच सदरील सर्व हिशोब हा बँकेच्या वैधानिक लेखा परिक्षकांनी तपासला असुन नुकत्याच झालेल्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमध्ये त्यावर कोणताही आक्षेप घेतलेला नसुन त्यामुळे आपणास सदरचा जमा खर्च समजावून घ्यावयाचा असल्यास कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत येऊन आपण तो लेखा विभागप्रमुख यांचेकडुन समजावून घेऊ शकतात असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या उत्तरात स्पष्ट केले. त्यावर सर्व सभेने संमती दर्शवून व सभासदांचे एकमत होऊन सदर विषयास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

सुचक :श्री.जेजुरे भिमराव कोंडाजी
अनुमोदक :श्री.शेख अख्तार निसार
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.४ सन २०२४–२०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

ठराव क्र.४ सन २०२४–२०२५ या सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांनी तयार केलेला व बँकेला प्राप्त झालेला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल तसेच त्याबाबत बँकेने तयार केलेल्या दोषदुरुस्ती अहवालाचे वाचन बँकेचे ऑडीट विभागप्रमुख श्री.स्वप्निल लिलके यांनी केले.

बँकेला ऑडीट वर्ग “अ” मिळाला आहे. तसेच त्यात कुठल्याही प्रकारचे गंभीर दोष नाही असे नमुद केले. त्यावर सभासदांनी बँकेचे अभिनंदन केले व सभेत सविस्तर चर्चा करण्यात येऊन अहवाल योग्य व बरोबर असल्याने त्यांची नोंद घेण्यात आली.

सुचक : श्री.सानप बाळासाहेब महादू
अनुमोदक : श्री.घुगे प्रकाश दत्तु
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.५. दि.३१ मार्च २०२५ अखेर अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्र ५ बँकेचे लेखा विभाग प्रमुख श्री गंगाधर तारगे यांनी अहवाल पा.क्र.३९ वर छापलेल्या दि. ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चाच्या माहितीचे वाचन केले सर्व उपस्थित सभासदांनी काहीही आक्षेप न घेता सदर विषयास बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री.सानप बाळासाहेब महादू
अनुमोदक : श्री.कातड पाटील पंडीतराव रंगनाथ
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.६ नफावाटणी व लाभांश वाटपास मान्यता देणे.

ठराव क्र.६ दिनांक ३१ मार्च २०२५ रोजीच्या अहवालातील नफावाटणी जी बँकेने तयार केली आहे, ती बँकेचे लेखा विभागप्रमुख श्री.गंगाधर तारगे यांनी सभेस वाचून दाखविली. सदरची नफा वाटणी खालील प्रमाणे —

तपशील	रक्कम
निव्वळ नफा विनियोगासाठी उपलब्ध	**४१८०९८९६०.००**
२५ टक्के राखीव निधी	२६१३५७८०३.००
१० टक्के आपत्कालीन निधी	४१८०९८९६.००
१ टक्का शैक्षणिक निधी	४१८०९९०.००
१ टक्का धर्मदाय निधी	४१८०९९०.००
१ टक्का सहकार पुर्नवसन, पुर्नरचना आणि विकास निधी	४१८०९९०.००
१५ टक्के लाभांश	७७४१९७९४.००
१० टक्के सानुग्रह अनुदान	२४९६८४९७.००
एकुण	**४१८०९८९६०.००**

यावर चर्चा होवून लाभांश वाटपाविषयी बोलतांना सभासद श्री.देविदास काशिनाथ शिरूडे यांनी अहवालातील दोष दुरूस्तीत राखीव निधी, लाभांश, सानुग्रह अनुदान इ. आकडेवारींमध्ये तफावत दिसत असल्याचे वाटत आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना नफावाटणी बाबत सर्व हिशोब समजवुन सांगितला त्यावर त्यांचे समाधान झाले. व सदर चर्चेनंतर नफावाटणी व लाभांश योग्य असल्याने त्यास सभेने बहुमताने मान्यता दिली.

सुचक : श्री.नाशिककर आशिष अरविंद
अनुमोदक : श्री.शिरूडे देविदास काशिनाथ
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.७ संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

ठराव क्र.७ संचालक व त्यांच्या नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती पान क्र.३४ वर दिलेली असुन ती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमास अनुसरून असल्याचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस सांगितले त्यावर सभेचे समाधान होऊन त्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

सुचक : श्री.सानप बाळासाहेब महादू
अनुमोदक : श्री.बुढाऐर तेज बहाद्दुर कमल सिंग
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.८ रिझर्व्ह बँकेच्या नियमांना अधिन राहून एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत तडजोड केलेल्या पात्र थकीत कर्जखात्यांना मान्यता देणे.

ठराव क्र.८ रिझर्व्ह बँकेच्या नियमांना अधिन राहून एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत बँकेने थकबाकीदार सभासदांना तडजोड करून खाते बंद करण्यासाठी जे निकष ठरविले आहेत व त्याप्रमाणे त्यांची खाती बंद केली आहेत असे नमुद करून सर्व खात्यांची माहिती सभेस देण्यात आली. त्यांना मंजूरी देण्यात यावी अशी विनंती सभेला करण्यात आली. त्यास सर्व उपस्थित सभासदांनी खालील कोष्टकांप्रमाणे तडजोडीने बंद केलेल्या खात्यांना बहुमताने मंजुरी दिली.

कालावधी	खाते संख्या	मुद्दल + व्याज एकुण रक्कम रू	तडजोड वसुल रक्कम रू	व्याजात दिलेली सुट रक्कम रू
०१.०४.२०२४ ते३१.०३.२०२५	१२१	५,४५,२६,२४८/—	१,९६,१९,६३०/—	३,४९,०६,६१८/—

तसेच यापुढे ज्या थकबाकीदार कर्जदारांचे अर्ज येतील त्यांना नियमाप्रमाणे तडजोड करून खाते बंद करून घेण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यास सभेने बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री.मंडलेचा संतोष चंदुलालजी
अनुमोदक : श्री.क्षिरसागर प्रकाश विश्वनाथ
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.९ सन २०२५—२०२६ सालाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकाला मान्यता देणे.

ठराव क्र.९ सन २०२५—२०२६ सालाच्या अंदाज पत्रकाबाबतची माहिती बँकेचे सरव्यवस्थापक श्री. त्रिगुण कुलकर्णी यांनी सभेला वाचुन दाखविली. अंदाजपत्रकाचे आम्ही वाचन केलेले आहे ते बरोबर आहे अशी सुचना सभासद श्री.राजमल टिकमचंद कुमट यांनी केली त्यावर सर्व सभासदांचे एकमत होऊन सदर अंदाजपत्रकास सर्व सभासदांनी बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री.कुमट राजमल टिकमचंद
अनुमोदक : श्री.दशपुत्रे शाम नरहर
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१० भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि.२७ एप्रिल २०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार आर्थिक वर्ष २०२५—२६ साठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करणेकामी संचालक मंडळाने अंतिम केलेली नावे व तसा भारतीय रिझर्व्ह बँकेस पाठविलेल्या प्रस्तावाची नोंद घेऊन मान्यता देणे.

ठराव क्र.१० बँकेचे वैधानिक लेखा परिक्षक मे.रतन चांडक ॲण्ड कंपनी एलएलपी यांच्या मागील वर्षीच्या कामाचा अनुभव बघता सन २०२५—२६ करीता पुर्ननियुक्तीचा प्रस्तावा भारतीय रिझर्व्ह बँकेस आपल्या बँकेने दि.२३.०७.२०२५ रोजी पाठविला होता. त्यास भारतीय रिझर्व्ह बँकेने दि.०८.०८.२०२५ रोजी फेरनियुक्ती करणेस मान्यता कळविलेली आहे. बाबतची माहिती ऑडीट विभागप्रमुख श्री.स्वप्निल लिलके यांनी सभेस दिली. त्यास सभेने बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री.बच्छाव प्रमोद बंडुकाका
अनुमोदक : श्री.डुंगरवाल राहुल प्रविणचंद
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.११ सन २०२६—२०२७ या वर्षासाठी कंकरंट ऑडीटर्सच्या नेमणूकीचा अधिकार संचालक मंडळास देणे.

ठराव क्र.११ सन २०२६—२०२७ या वर्षासाठी कंकरंट ऑडीटर्सच्या नेमणूकीचे सर्वस्वी अधिकार बँकेच्या संचालक मंडळास देण्यात यावे असे बहुमताने ठरले.

सुचक : श्री.जातेगांवकर अरूण रामकिसन
अनुमोदक : श्री.भट्टड निरज जगदीश
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१२ संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीबाबत विचार विनिमय करून मान्यता देणे.

ठराव क्र.१२ बँकेच्या सन २०२५—२०२६ च्या अहवालातील पान क्रमांक ४१ ते ४४ वरील पोटनियम क्रमांक ९/ब/४, १३/१, १४/१, २९/८, ३५/२१/ब, ४३/२/आय यातील प्रस्तावित दुरुस्ती मसुदा बँकेचे अध्यक्ष श्री.हेमंत हरीभाऊ धात्रक यांनी सभेला सविस्तर समजावून सांगितले त्यावर पोटनियम दुरूस्ती क्रमांक ९/ब/४ विषयी चर्चा करतांना सभासद श्री.शाम दशपुत्रे यांनी जुने सभासद रद्द करू नये त्यांना रूपये १,०००/— चे शेअर्स करण्यासाठी मुदत दयावी असे सूचविले त्यावर सभासद श्री.बाळासाहेब सानप यांनी श्री.शाम दशपुत्रे यांच्या सुचनेस दुजोरा दिला व सभेतील बऱ्याच सभासदांनी यावर सहमती दर्शविली त्यामुळे पुढील तक्त्यातील पोटनिमय

९/ब/४	अशा व्यक्तीने सभासदत्वासाठी कमीत कमी दहा भागाची पूर्ण रक्कम रू.१०००/— भरलेली असली पाहीजे, तसेच अशा व्यक्तींचा सभासदत्वाचा अर्ज संचालक मंडळाने संमत केलेला पाहीजे.	अशा व्यक्तीने सभासदत्वासाठी कमीत कमी दहा भागाची पूर्ण रक्कम रू.१०००/— भरलेली असली पाहीजे, तसेच अशा व्यक्तींचा (सभासदत्वाचा) अर्ज संचालक मंडळाने संमत केलेला पाहिजे यांत ज्या व्यक्तींनी यापूर्वी एक हजारपेक्षा कमी रकमेचे भाग खरेदी केले असतील त्यांनी रूपये एक हजार रक्कम होईल एवढी रक्कम जमा केली पाहिजे सदर रक्कम जमा करणेस एक वर्षाचा कालावधी जानेवारी ०१, २०२६ ते डिसेंबर ३१, २०२६ सभासदांना देण्यात येईल. यानंतर मात्र उर्वरित रक्कम जमा न झाल्यास सदर व्यक्तीचे सभासदत्व रद्दबादल धरण्यात येईल व त्यांची भागरक्कम ही संबंधित सभासदास परत करण्यात येईल. तशी रक्कम परत मिळण्याची मागणी सभासदाने न केल्यास सदर रक्कम शेअर्स सस्पेन्स खात्यात ठेवण्यात येईल व सभासदाची मागणी ज्या वेळेस येईल त्या वेळेस परत करण्यात येईल. परंतु हे करण्यापूर्वी जे सभासद सदरची रक्कम मागणी करतील त्यांना ती परत देण्यात येईल.	किमान रूपये एक हजाराचे भाग धारण करणाऱ्यांनाच सभासदत्व राहणेसाठी कारण आजच्या काळात रू.१०० ही रक्कम सभासदत्वासाठी खुप कमी आहे. परंतू सदरचा पोटनियम वार्षिक सर्वसाधारण सभेने नामंजूर केलेला आहे.

क्रमांक ९/ब/४ तुर्त दुरूस्त न करता मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, सहकार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे दुरूस्ती करीता पाठवू नये. सभासदांना रूपये १,०००/— चे शेअर्स करणेकरीता एक वर्षाची मुदत देऊन पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेवर घेण्यात यावा असे बहुमताने ठरले तसेच २९/८ बाबत चर्चा करतांना काही सभासदांनी सदर पोटनियमातील रू. २,००,०००/— ठेवी व रू.२५,०००/— चे शेअर्स जास्त वाटतात असा प्रश्न उपस्थित केला त्यावर अध्यक्ष श्री.हेमंत धात्रक यांनी काही सभासदांचे आलेले पत्र सभासदांपुढे सादर केले त्यात असे लिहिलेले होते की, इतर छोटया पतसंस्था आणि बँकांनी सदरची पोटनियम दुरूस्ती बऱ्याच वर्षापूर्वी केलेली असुन आपण खूप उशिर करत आहोत आणि मुदत ठेव रक्कम रू. २,००,०००/— चे ऐवजी रू.५,००,०००/— करावी व शेअर्सची रक्कम रू.२५,०००/— वरून रू.५०,०००/— करावी असे नमूद केलेले आहे परंतु सदरची वस्तुस्थिती असुन आपण ते न

वाढविता ज्याप्रमाणे पोटनियम तयार केलेले आहेत त्याचप्रमाणे ठेवणार आहोत. त्यावर सभासद गजानन शेलार यांनी सदर पोटनियम दुरूस्तीत दिलेली २ वर्षाची अट कमी करता येत असल्यास तसा विचार करावा व अनुसूचित जाती—जमाती, भटक्या जमाती यांच्याकरीता सदरची रक्कम ही कमी करता येत असल्यास त्याचा पण विचार करावा. किंबहुना सदरचे मुदतठेव व शेअर्स हे निवडणूकीचे अर्ज स्विकारतांना भरून घेतल्यास वावगे होणार नाही असे सूचविले त्यावर सभासद रवि पगारे यांनी अनुसूचित जाती—जमाती, भटक्या जमाती यांचे करीता बऱ्याच बँकांमध्ये रक्कम कमी ठेवण्यात आली आहे आपणही तसा बदल करावा असे सूचविले त्यावर बँकेचे अध्यक्ष हेमंत धात्रक यांनी अनुसूचित जाती—जमाती करीता योग्य तो बदल करून सदरचा पोटनियम दुरूस्तीकरीता पाठविण्यात येईल आणि सभासद श्री.गजानन शेलार यांनी सूचविल्यानुसार जर निवडणूकीच्या वेळी सदर मुदतठेव व भागरक्कम घेतल्यास निवडणूकीच्या कार्यक्रमात व्यत्यय येऊन निवडणूक अधिकाऱ्यांची दिशाभूल होण्याची शक्यता निर्माण होईल त्यामुळे आपण सदरचे पोटनियम आहे त्याच पध्दतीने दुरूस्ती करीता पाठवून देऊ जर त्यांनी सदरची मुदत कमी करून दिली तर योग्यच होईल असे उत्तर दिले त्यावर सभेचे एकमत होऊन पुढील प्रमाणे पोटनियम दुरूस्तीचा ठराव करून अतिम मंजूरीकरीता मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, सहकार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे पाठविण्यात यावा असे बहुमताने ठरले.

पोट नियम क्रमांक	सध्याचा पोट नियम	दुरूस्ती नंतरचा पोट नियम	दुरूस्तीचे कारण
१३/१	एखादया सभासदास आपला एक अगर अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाचे नांवाने वर्ग केले असतील त्याचे नांव भागाच्या रजिस्टर मध्ये नोंदले गेल्याशिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. तसेच यासाठी प्रत्येक भाग दाखल्याबरोबर ''वर्ग फी'' म्हणून रु. १० भरली पाहिजे.	एखादया सभासदास आपला एक अगर अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने वारस म्हणुन नामनिर्देशित केलेली व्यक्ती किंवा कायदेशीर वारसदार किंवा सभासदाचे नांवाने वर्ग केले असतील त्याचे नांव भागाच्या रजिस्टर मध्ये नोंदले गेल्याशिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. तसेच यासाठी प्रत्येक भाग दाखल्याबरोबर ''वर्ग फी'' म्हणून रु. १० भरली पाहिजे.	भाग हस्तांतरण प्रक्रियेत सुसुत्रता येणेकरीता
१४/१	सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देवून स्वत:चे भागभांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेवू शकेल. मात्र तसे करण्यापूर्वी त्यांचेकडे येणे असलेल्या रकमांची पूर्ण फेड झाली असली पाहीजे व जामीनदार म्हणून असलेली जबाबदारी पूर्ण झालेली असावी तसेच सभासदत्व कमी करतांना सभासद होवून दोन वर्षापेक्षा कमी काळ झालेला नसावा. कोणत्याही सहकारी वर्षात अशा तऱ्हेने परत करण्यांत आलेले भांडवल त्या वर्षापूर्वीचे ३१ मार्च रोजी असलेल्या वसूल झालेल्या भांडवलाचे १० टक्के पेक्षा जास्त रकमेचे असणार नाही अशा परत केलेल्या भांडवलामुळे वसुल	सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देवून स्वत:चे भागभांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेवू शकेल. मात्र तसे करण्यापूर्वी त्यांचेकडे येणे असलेल्या रकमांची पूर्ण फेड झाली असली पाहीजे व जामीनदार म्हणून असलेली जबाबदारी पूर्ण झालेली असावी तसेच सभासदत्व कमी करतांना सभासद होवून एका वर्षापेक्षा कमी काळ झालेला नसावा. कोणत्याही सहकारी वर्षात अशा तऱ्हेने परत करण्यांत आलेले भांडवल त्या वर्षापूर्वीचे ३१ मार्च रोजी असलेल्या वसूल झालेल्या	वाढत्या सभासद संख्येवर नियत्रंण ठेवण्यासाठी

	झालेल्या भाग भांडवलाची व निधीची खरी किंमत बँकींग रेग्युलेशन ॲक्ट कलम ११(१) नुसार निर्देशीत केलेल्या किंमती पेक्षा कमी होणार नाही हे पाहिले पाहिजे.	भांडवलाचे १० टक्के पेक्षा जास्त रकमेचे असणार नाही अशा परत केलेल्या भांडवलामुळे वसुल झालेल्या भाग भांडवलाची व निधीची खरी किंमत बँकींग रेग्युलेशन ॲक्ट कलम ११(१) नुसार निर्देशीत केलेल्या किंमती पेक्षा कमी होणार नाही हे पाहिले पाहिजे.	
२९/८	नविन	कोणत्याही सभासदास बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी करावयाची असल्यास अशा व्यक्तीने बँकेत मुदतठेव रू. २००००० (रूपये दोन लाख) व शेअर्स रू.२५००० (रूपये पंचवीस हजार मात्र) तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, "डिनोटीफाईड जमाती" व "भटक्या जमाती" या गटातून एखादया सभासदास उमेदवारी करावयाची असल्यास त्याने मुदतठेव रक्कम रू. १०००००/— (रूपये एक लाख) व शेअर्स रू. १००००/— (रूपये दहा हजार मात्र) चे भाग निवडणूक वर्षाच्या किमान २ वर्ष अगोदर धारण केलेले असावे.	बँकेच्या पंचवार्षिक निवडणूकीत सुसूत्रता (पारदर्शकता) येणेसाठी
३५/२१/ब	बँकेच्या वाढत्या व्यापामुळे कामकाजाचे सोयीसाठी सर्व शाखांना संचालक समिती संचालक मंडळ नियुक्ती करतील. त्यास तीन संचालक मंडळ सदस्य व शाखाप्रमुख पदसिध्द असे चार सदस्य राहतील. या समितीची मुदत नेमणुकीपासून एक वर्ष अगर संचालक मंडळाच्या मुदती पर्यंत यांत जी कमी मुदत असेल तोपर्यंत राहील. या शाखा संचालक समितीस रु.२५,०००/— पर्यंतचे क्लिन कॅशक्रेडीट (विनातारणी कर्ज) व रु.१,००,०००/—पर्यंतची नजरगहाण कर्जे (तारणी कर्जे) मंजूर करण्याचे अधिकार राहतील. ही मंजुरी अर्थातच पोटनियम/ कर्जनियम व रिझर्व्ह बँकेचे अध्यादेश यांच्या कक्षेत राहील. शाखेवर नियंत्रण ठेवणेचे दृष्टीकोनातून शाखा समिती सभेवर थकबाकी वसुली बाबतचे नियंत्रण ठेवणेचे अधिकार, किरकोळ खर्च	पोटनियमातून कमी करणे.	भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेच्या संचालकांना बँकेच्या दैनंदिन कामकाजात हस्तक्षेप करण्यास मनाई असल्याने सदर पोटनियम हा कमी करण्यात येत आहे.

	मंजुरीचे अधिकार, शाखा अद्ययावत राहणेचे दृष्टीकोनातून नियंत्रण ठेवणे व मुख्य कार्यालयाचे परिपत्रकाची अंमलबजावणी इ. बाबतचे निर्णय घेणेचे अधिकार राहतील. अशा सभांचे इतिवृत्त/कर्जअर्ज रजिस्टर्स संचालक मंडळ सभेवर नोंद घेणेसाठी येतील. केंद्रकार्यालयात मात्र नेहमीप्रमाणे कर्ज अर्ज छाननी उपसमिती राहील. ज्या उपसमितीस केंद्र कार्यालयाचे सर्व प्रकारचे कर्ज अर्ज व इतर सर्व शाखांचे शाखा समितीस अधिकार दिलेल्या मर्यादेव्यतिरिक्त सर्व कर्ज मागणी अर्ज विचारार्थ ठेवले जातील.		
४३/२/ आय	नविन	शुध्द लाभाच्या पाच प्रतिशतपेक्षा जास्त नसलेली राशी दान म्हणुन अशा कोणत्याही उद्देशांसाठी, जी सहकारी चळवळीला पोषक आहे किंवा दातृत्व कार्यासाठी जसे की चॅरिटेबल एनडाऊमेंट ॲक्ट १८९० (१८९० चा ६ वा) च्या सेक्शन २ मध्ये परिभाषित करण्यात आलेले आहे.	बँकेची नफा वाटणी योग्य पध्दतीने (नियमाप्रमाणे) होणेकरीता. तसेच बहुराज्यीय सहकारी कायदा कलम ६३ २ क नुसार.

वरीलप्रमाणे पोटनियम दुरूस्ती मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, सहकार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे पाठविणेकामी आवश्यक त्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दीक्षित यांना देण्यात यावे असे ठरले.

सुचक :— श्री.दायमा योगेश नंदलाल
अनुमोदक :— श्री.सानप बाळासाहेब महादू
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१३ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या मुदतवाढीची नोंद घेणे.

ठराव क्र.१३ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्राम दीक्षित यांच्या कार्यकाळास दि.१२.१२.२०२४ रोजी ३ वर्ष पुर्ण झाल्याने त्यांच्या कार्यकाळातील कामाचा आढावा घेऊन संचालक मंडळाने भारतीय रिझर्व्ह बँकेस त्यांच्या फेरनियुक्तीबाबत ०५ डिसेंबर २०२४ रोजी प्रस्ताव पाठविला होता त्यास भारतीय रिझर्व्ह बँकेने दि.०३ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यकाळास दि.१२ डिसेबर २०२७ पर्यंत फेरमंजूरी दिलेली आहे बाबतीच माहिती सभेला देऊन त्याची नोंद घेण्यात आली.

सुचक : श्री.हरकूट नंदकिशोर सुरेश
अनुमोदक : श्री.जैन बाळु टिकमचंद
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१४. महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्याबाहेरील सहकारी बँकांचे आपल्या बँकेत विलीनीकरण करून घेणेसाठी संचालक मंडळास अधिकार प्राप्त होणेबाबत.

ठराव क्र.१४ सदर विषयाबाबत माहिती देतांना अध्यक्ष श्री.हेमंत धात्रक यांनी नाशिकमधील एका बँकेने आपल्याशी संपर्क साधून विनंती केली होती. त्याबाबत आपण डयु डिलिजीअस सुध्दा करून घेतले होते. परंतू नंतर त्यांचे मत परिवर्तन झाल्याने त्यांनी नकार दिला परंतू भविष्यात एखादी चांगली मोठी बँक आपल्याला भेटल्यास व ती योग्य असल्यास आपण घेऊ असे सभेस सांगितले त्यावर सभासद श्री.गजानन शेलार यांनी सदर ठराव मंजूर करण्यास हरकत

नाही परंतू बँक घेतांना तिची मालमत्ता तपासून घ्यावी व आपल्या बँकेला त्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी अशी सुचना करून मंजूरीस हरकत नाही असे सूचविले. त्यास सर्व सभासदांनी बहुमताने मंजूरी देऊन महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्याबाहेरील सहकारी बँकांचे आपल्या बँकेत विलीनीकरण करून घेणेसाठी संचालक मंडळास सर्व अधिकार देण्यात यावे व अशा बँकेचे सर्व कायदेशीर पुर्तता करून घेतले नंतर अंतिम मंजूरीसाठी जर वार्षिक सर्वसाधारण सभेस बराच कालावधी लागणार असल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात यावी असे ठरले.

सुचक : श्री.शेलार गजानन दामोदर
अनुमोदक : श्री.सांगळे राजाराम निवृत्ती
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१५. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या लघु वित्तीय बँक संक्रमण योजनेनुसार आपल्या बँकेस लघु वित्तीय बँकेत संक्रमित करण्यासाठी मान्यता देणे व सदर प्रक्रिया सुलभतेने होणे कामी संचालक मंडळास आवश्यक पाऊले उचलणे कामी अधिकार देणे.

ठराव क्र.१५ मा.अध्यक्ष हेमंत धात्रक यांनी सदरचा विषय संपूर्ण समजावून घेण्याचे आवाहन केले व माझे बोलणे संपल्यानंतर एक एक सभासदाने आपले मत मांडावे मध्येच कोणीही व्यत्यय आणु नये. विषयांतर होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी. कारण विषय फार महत्वाचा आहे असे आवाहन सभासदांना केले व स्मॉल फायनान्स बँकेविषयी बोलतांना भारतीय रिझर्व्ह बँकेचा परिपत्रकास अनुसरून व काही तज्ञ, विधिज्ञ व लेखापरिक्षक यांच्याशी चर्चा करून एक आढावा आम्हांस प्राप्त झाला ते आम्ही सदर सभेसमोर ठेवत आहे. त्याच प्रकारे गेल्या दोन तीन दिवसांपासून वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातमीने सर्व सभासदांमध्ये या विषयी जनजागृती केली आहे. जे सभासद सभेस हजर नाही त्यांना सुध्दा या विषयाची कल्पना त्यामुळे झालेली आहे त्याबद्दल वृत्तपत्रांचे आभार. सध्या आपण सहकार कायदयाखाली काम करत आहोत. परंतु स्मॉल फायनान्स बँक करतांना आपल्याला कंपनी कायदा लागू होईल. जे सभासद बँकेचे खाजगीकरण हा शब्द वापरत आहे तर मी अगोदरच सांगू इच्छितो की, कुठल्याही प्रकारे बँकेचे खाजगीकरण होणार नाही यात बँकेचे जे दोन लाख दोन हजार सभासद आहे त्यांच्या कुठल्याही हितसंबंधास बाधा येणार नाही या पध्दतीने सर्व प्रक्रिया होणार आहे तेच सभासद बँकेचे मालक राहणार आहे. सर्वांचे सभासदत्व अबाधित राहील. बँकेच्या पोटनियम दुरूस्तीस अनुसरून सदर सभासद कायम राहतील. सध्याच्या बँकेच्या नावातील को—ऑपरेटिव्ह हा शब्द राहणार नाही. तर दि नासिक मर्चन्टस बँक लि किंवा नामको बँक लि. असे बँकेचे नाव होईल. प्रमोटर होण्यासाठी येथे कोणत्याही प्रकारचे लाखात शेअर्स घेण्याची गरज नाही. बँकेच्या पोटनियमाप्रमाणे १०० ते १००० रू जे काही असेल ते गरजेचे राहणार आहे. संचालक हा १०० रू चा भाग असलेला भागधारक सुध्दा होवू शकतो. संचालकांची संख्या साधारणपणे ५ ते १५ अशी असेल. काही सभासदांचे असे म्हणणे आहे की, संचालकांचे १० वर्ष पुर्ण होत असुन त्यामुळे हे सर्व घोळ घालत आहे तर मी स्पष्ट करू इच्छितो की स्मॉल फायनान्स बँकेत संचालकांचा कार्यकाळ हा फक्त ८ वर्ष आहे. आपण सध्या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे कर्ज देऊ शकत नाही परंतू स्मॉल फायनान्स बँक झाल्यावर आपण शेतकऱ्यांना कर्ज देऊ शकू. आपल्या बँकेच्या जास्तीत जास्त शाखा या ग्रामीण भागात आहे व सभासदांना सुध्दा गेल्या अनेक निवडणूकांमध्ये आपण त्यांना कर्ज देऊ असे आश्वासन देत आलेलो आहे. ते या माध्यमातून पूर्ण होणार आहे. १८% फंडींग आपण शेतकऱ्यांना करता येणार आहे. तसेच सरकारच्या शेतकऱ्यांकरीता असलेल्या सर्व योजना आपणास राबविता येणार आहे. जे अर्बन को—ऑप बँक असतांना शक्य होणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या शेतकऱ्यांच्या सबसिडीज आपणास लागू होतील. आपल्या बँकेचा सभासद वर्ग बदललेला आहे. साधारणपणे आज सभासदांची तिसरी—चौथी पिढी बँकेत येण्यास सुरूवात झालेली आहे त्यांना सर्व व्यवहार हे ऑनलाईन लागतात ते प्रत्यक्ष बँकेत येण्याचे टाळतात. स्मॉल फायनान्स बँकेत गेल्याने

आपल्याला ऑनलाईन बँकींग सुविधा लगेच बहाल होईल. ज्याकरीता को–ऑप मध्ये असतांना त्यात अनेक अडचणी आणल्या जातात. आपण आपल्या बँकेचे डाटासेंटर तसेच फिनॅकल सारखे जे जगात वापरले जातात ते सॉफ्टवेअर घेतले परंतू ऑनलाईन बँकींग करीता जाचक अटींचा सामना करावा लागतो तो आपल्याला स्मॉल फायनान्स बँकेत करावा लागणार नाही. तसेच काही सभासदांनी प्रश्न उपस्थित केला की, एखादा धनाढय आला व त्याने एकदम ५०% भाग घेतले तर तो बँकेचा मालक होईल. तर मी ही बाब स्पष्ट करू इच्छितो की, कोणाही सभासदास ५% पेक्षा जादा भाग घेता येत नाही. सभासदांचा जो विश्वास संचालक मंडळावर आहे त्यास कुठल्याही प्रकारे तडा आम्ही जाऊ देणार नाही. आपण सदरचे प्रपोजल घेऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे गेलो व लगेच त्यांनी परवानगी दिले असे होत नाही. आतापर्यंत त्यांनी फक्त एकाच को–ऑप बँकेस परवानगी दिली आहे. त्यामुळे अजून आपल्या बँकेच्या निवडणूकीस साधारणपणे ३ ते ४ वर्ष आहे. तेवढा कदाचित त्यापेक्षाही जादाचा कालावधी सदर प्रक्रियेत लागू शकतो. सध्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा विलीनीकरणावर जास्त भर आहे आपली बँक धड मोठीपण नाही व एकदम लहान पण नाही त्यामुळे असे गंडांतर येण्याच्या आतच आपण योग्य तो निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यामुळे आम्ही सर्व संचालकांनी चांगल्या नावाजलेल्या तज्ञांचा सल्ला घेऊन सदरचे पाऊल उचलण्याचे ठरवले आहे. भविष्यात आपली बँक कोणाही इतर चुकीच्या हातात जाता कामा नये. ज्या भरवश्याने बँक आपण आम्हा संचालकांवर भरवसा ठेऊन ताब्यात दिली त्याचप्रमाणे पुढे ती चांगल्या हातात जाणे गरजेचे आहे म्हणुन हे पाऊल उचलत आहोत. त्याकरीता जग प्रसिध्द KPMG कंपनी व पाठक ॲण्ड असोसिएट्स असे नावाजलेल्या संस्था आपल्याबरोबर काम करत आहे. त्यांचा सल्ला आपण याकरीता घेतलेला आहे. यापध्दतीने मा.अध्यक्ष श्री.हेमंत धात्रक यांनी स्मॉल फायनान्स बँकेत जाण्याचे फायदे सर्व सभासदांना सविस्तर समजावून सांगितले व सर्व सभासदांचे मत ऐकून नंतरच आपण पुढे जाणार आहोत त्याकरीता माझे सर्वांना विनंती आहे की, एक एक करून आपण आपले मत मांडावे जेणेकरून आम्हांस पुढील काळात या पध्दतीने प्रवास करता येईल.

त्यांनतर सभासद श्री.धनंजय अबोले यांनी सांगितले की, आपण सांगितले की ५% पेक्षा भागभांडवल घेता येणार नाही परंतू आम्ही १० सभासद एकत्र येऊन ५% प्रमाणे भागभांडवल टाकल्यास ५०% भाग होतील व ते बँकेचे मालक होतील असेही होऊ शकते किंवा एखादी अंबानी अदाणी सारखी फॅमिली आली त्याने घरातीलच १० मेंबर भाग घेऊन गेले तर तेच बँकेचे मालक होतील. त्यांचेकडे पैश्यांची कमतरता नाही त्याचे काय, त्यांनतर सभासद ॲड.अमृतलाल पिपाडा यांनी आपले मत स्पष्ट करतांना सांगितले की, आज आपली को–ऑप सहकार खालची ही बँक आहे. एक व्यक्ती एक मत असे मतदानाचा अधिकार आहे. पब्लिक लिमिटेड कंपनी झाले नंतर एक व्यक्ती एक मत हे राहणार नाही. त्यावर अध्यक्षांनी मतदान हे लोकशाही पध्दतीनेच होईल असे स्पष्ट केले. त्यावर पिपाडा यांनी सांगितले की, ज्या व्यक्तीकडे जितके भाग आहे त्या प्रमाणात त्याला मतदानाचा हक्क राहील. सध्या आपण लोकशाही पध्दतीने निवडणूका घेतो परंतू पब्लिक लिमिटेड कंपनी झाल्यावर असे होणार नाही. यावर ई वोटींग होईल त्यामुळे सर्वसाधारण सभासदाचा मतदानाचा हक्क हा हेरावला जाणार आहे. आपण सांगितल्याप्रमाणे सभासद हे नाममात्र राहतील. परंतू ज्यांचेकडे जादाचे भाग आहे त्यांनाच मतदान करता येईल. ज्या पध्दतीने आज एक मत मांडले गेले की जर ५१% भाग एक व्यक्ती किंवा ग्रुपकडे गेले तेच या बँकेवर राज्य करू शकतील. ज्या पध्दतीने आतापर्यंत एकाच बँकेला सदरची परवानगी मिळाली आहे असे आपण सांगितले परंतू यात जर फायदा असता तर अनेक बँका सदर मार्गावर गेल्या असत्या ही साधी गोष्ट आहे. ज्या पध्दतीने १९५९ साली आपल्या बँकेची स्थापना ज्या उद्देशाने केली गेली तो उद्देश राहणार नाही. पब्लिक कंपनीत संचालकांना सॅलरी दिली जाते. त्यामुळे एकूणच हा विषय ज्या गावाला जायचे नाही त्याचा रस्ता धरावाचाच कशाला असे मला वाटते व माझे मत आहे.

त्यानंतर सभासद श्री.जगदीश प्रभाकर घोडके यांनी सांगितले की, ज्या पध्दतीने स्मॉल फायनान्स बँकेचा प्रश्न चालु आहे तर त्यात काही वावगे नाही. जग हे बदलत आहे. ज्या पध्दतीने अध्यक्ष महोदयांनी सांगितले की, काही सभासदांचे खापर पंतू सुध्दा आता बँकींग करत आहे त्यातील मी सुध्दा आहे. आपण स्मॉल फायनान्स बँकत जातांना बँकेचे अल्पभागधारक जे की भाजीविक्रेते, रिक्षाचालक यांचा सुध्दा सन्मान झाला पाहिजे त्या करीता मी सदर विषयाचे समर्थन करतो. आपण आता २१ व्या शतकात वावरत आहे आणि बँकींग ज्या पध्दतीने बदलत आहे त्यापध्दतीने नामको बँक हे एक मोठे वलय आहे. त्यामुळे सदर स्मॉल फायनान्स बँक केल्याने नाशिकचे नाव मोठेचे होणार आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी विचार करावा व सदर विषयास समर्थन दयावे. कारण अध्यक्ष महोदय व संचालक मंडळ यांनी घेतलेल्या निर्णयामुळे नक्कीच काहीतरी चांगले घडेल. यामुळे माझे सदर विषयास समर्थन आहे व आपण सर्वांनी समर्थन दयावे ही माझी विनंती राहील.

त्यानंतर श्री.भिमराव जेजुरे मनमाड यांनी सांगितले की, मध्यंतरी बँकेवर प्रशासक आलेत त्यांनी बँकेचे वाटोळेच केले. २०० कोटी इकडे तिकडे टक्केवारी घेऊन वाटप केले. अश्यांच्या ताब्यात ही बँक जाऊ नये अशी मी आपल्याला विनंती करतो. तत्राब आपण हा जो निर्णय घेत आहात त्यात आपल्याला शेतकऱ्यांना कर्ज देता येणार आहे ही अतिशय स्तुत्य बाब आहे. कारण ५०% ते ७०% सभासद हे ग्रामीण भागातील आहे. त्यामुळे आपण जर सर्व अटी पुर्ण करत असल्यास सदर ठराव मंजूर करावा. माझी त्याला मंजूरी आहे. व सर्वांनी समर्थन करावे अशी मी विनंती करतो.

तसेच सभासद श्री.कातड पाटील यांनी सांगितले की, आपण जर सर्व नॉर्म्समध्ये बसत असाल आणि जर शेतकऱ्यांना या माध्यमातून कर्ज मंजूर करता येत असेल तर हा ठराव मंजूर करावा. कारण ५०% ते ७०% सभासद हे शेतकरी आहे आणि व्यापाऱ्यांना देखील विनातारणी ५ ते २५ लाख रू कर्ज देता येणार आहे. त्यामुळे सदर ठराव मंजूर करावा कारण सदर प्रक्रियेस बराच वेळ जाणार आहे.

त्यानंतर अक्तार शेख यांनी सांगितले की, हा विषय अत्यंत चांगला व कौतुकास्पद आहे त्यामुळे आमचे सदर विषयास समर्थन आहे. आपल्या सर्व संचालक मंडळासोबत आम्ही नेहमीच उभे राहू असे स्पष्ट केले. व नंतर सभासद ॲड.श्रीधर व्यवहारे यांनी आपले मत स्पष्ट करतांना सांगितले की, आपणा सर्वांचे धन्यवाद की आपण एक नवा विचार सर्व सभासदांसमोर आणला. कारण सर्वच विकसित भारत या विचाराने काम करत आहे. त्यात तुम्हीही सदरचा विषय आणला चांगली गोष्ट आहे. त्याबद्दल आपले अभिनंदन. आपण एक बिल्डर आहात आणि आपण एक टॉवर बांधण्याचे स्वप्न पाहिले त्याबद्दलही धन्यवाद खुप चांगला विचार आहे. पण एक विचारात ठेवले पाहिजे की टॉवर बांधण्यासाठी त्याचे पिलर भक्कम असावे लागतात. आपण म्हणतात की, सहकारात नियम अतिशय कडक झाले असतील पण काही मागील अनुभव रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे आहे. कारण त्यांचेकडे अनेक विधिज्ञ काम करतात आणि चांगला विचार करूनच ते नियम बनवत असतील. तसेच सहकार खाते हे भारताचे गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे आहे. सहकार खाते त्यांचेकडे का दिले असेल तर त्याचा पण आपण विचार करणे गरजेचे आहे. कारण त्यातील लुपहोल्स बाजूला करून नविन नियम त्यांनी तयार केलेले आहे. ते आपल्याला पाळायचे असतील तर आपल्याला रिझर्व्ह बँकेचे नियम व को–ऑप चे नियम पाळावेच लागतील. पळवाटा शोधण्यासाठी हाच एक मार्ग आहे का तर नाही तर त्याकरीता स्मॉल फायनान्स बँक झाली पाहिजे असे नाही तर तुम्हांला शाखा विस्तार करता येणे, तुम्हांला कोलॅबरेशन करता येणे, लोकांबरोबर कॉर्डीनेट करता येणे अशा इतर माध्यमातून आपण बँकेची प्रगती करू शकता. आपण आपल्या शाखा विस्तार करून बँक वाढवू शकता. आपण मल्टिस्टेट शेडयुल्ड असल्याने संपूर्ण भारतात व्यवसाय करू शकतो. पण त्यासाठी आपली यंत्रणा बळकट केली पाहिले. त्याचबरोबर संचालक मंडळ व प्रशासन बळकट केले पाहिजे. त्यांनी शेवटी सर्व सभासदांना सुध्दा विश्वासात घेतले पाहिजे हे महत्वाचे आहे. आपला शेतकरी हुशार आहे. आपली नामको बँक खेडयापाडयात घरोघरी पोहचलेली आहे. त्यांचा आपल्यावर विश्वास

आहे. त्यांना जर पर्याय दिले तर तो फक्त नामको बँकेची निवड करतो. कारण एवढा त्याचा आपल्या बँकेवर विश्वास निर्माण झालेला आहे. कारण हे सर्व तुमचेच कर्तृत्व आहे. HDFC व ICICI बँकेत जाण्यास आपला शेतकरी वर्ग तयार होत नाही कारण ते त्या सुट बूट मध्ये बसलेल्या कर्मचाऱ्याबरोबर काय बोलू याने धास्तावून जातात. ते आपल्या बँकेत कर्मचाऱ्यांशी आपुलकीने बोलतात. सहकार कधीही बंद होणार नाही त्याचे नियम आपल्याला पाळावेच लागतील. जर आपल्याला ते नियम पाळायचेच नसतील तर पळवाट काढता येणार नाही.आपल्याला अनेक संधी आहे. वाटल्यास आपण सर्व संचालक मिळून एखादी नविन बँक काढा त्यात आम्ही सभासद होऊ व आमचे खाते तेथे उघडू सर्व सभासद तुम्हांला त्याकरीता मदत करतील. आम्ही नेहमी आपल्याला मदतच करत आलेलो आहे आडवलेले नाही. आपल्याला विनंती आहे नामको बँक नामशेष होता कामा नये. ती आहे तशीच राहु दया दुसरी एखादी पर्यायी बँक काढा आम्ही नक्कीच मदत करू. एवढे म्हणून त्यांनी त्यांचे म्हणणे संपविले

नंतर सभासद श्री.प्रकाश घुगे यांनी गेल्या ५ ते ६ वर्षापूर्वी आपण बँकेची परिस्थिती बघितली कि कशा पध्दतीने बँकेवर प्रशासक लागले गेले. त्यावेळी बँकेचा एनपीए ३८ ते ३९% झाला हे सांगण्यामागे जर संचालक मंडळ असते तर एवढा एनपीए वाढला नसता व बँक आज वेगळया वळणावर असती. तेव्हा कोणीही सभासदाने प्रशासक हटविण्याकरीता प्रयत्न केले नाही. काहींनी प्रयत्न करून निवडणूका लावल्या व नंतर हेच संचालक मंडळ निवडून आले व एक प्रमुख विरोधक या नात्याने गजानन शेलार यांनी सर्वांचा सत्कार केला व त्यांची जबाबदारी वाढविली. कारण विरोधक जेव्हा सत्कार करतात तेव्हा निवडून आलेले १००% चांगलेच असतात आणि ते चांगल्या दिशेने बँक नेतील आणि आज बँक ज्या पध्दतीने काम करत आहे त्यांना मिळालेले पारितोषिक बघत आहोत तर खरोखरच संचालकांनी बँक एका चांगल्या वळणावर आणून ठेवली आहे. आताच एका सभासदाने सांगितले की, भाग घेऊन बँकेवर ताबा मिळविता येईल तर असे कधीच होत नाही. रिझर्व्ह बँकेचे नियम असतात. परंतू जर तसे झाले तर ज्याने पैसा लावला आहे त्यालाही काळजी असेल माझा पैसा कसा वाढेल व वाचेल, तसे होत नाही. असे एक उदा दिले. त्यांनी सांगितले की, मी सर्वांना विनंती करतो की, संचालकांनी ठेवलेल्या प्रस्तावास सर्वांनी मान्यता दयावी व बँकेबरोबर आपलीही प्रगती करावी. त्यानंतर सभासद सुधाकर बोडके ढकांबे यांनी मी बडोदा बँकेच्या बॉडीवर शेतकरी सदस्य म्हणुन आहे जर शेतकरी कर्ज घेतो तर ते फेडतो सुध्दा बँक चारपट सिक्युरिटी घेते आणि आज संचालकांनी मांडलेला हा विषयास बँक जर मोठी होणार असेल तर मी शेतकरी मंडळाच्या वतीने अनुमोदन देतो. व सदरचा प्रस्तव मंजूर करावा असे सर्वांना आवाहन करतो.

त्यांनतर सभासद नंदन भास्करे यांनी जर बँक खाजगी झाली तर त्यात अनुसूचित जातीकरीता व स्त्रियांकरीता राखीव जागा राहील का? खाजगीकरण झाले तर विश्वास कसा राहिल? असे प्रश्न उपस्थित केले त्यानंतर काही सभासदांनी विषयांतर केल्यामुळे गोंधळ उडाला व त्यामुळे सभेत व्यत्यय निर्माण झाला.

त्यानंतर सभासद राजाराम सांगळे यांनी सांगितले की, मी गेल्या ३० ते ४० वर्षापासुन ॲग्रीकल्चर विभागाशी संबंधित काम करतो. विदेशात सुध्दा माझे शेतीपूरक व्यवसायाचे शाखा आहेत. आणि नामको बँक जर ७०% शेतकरी सभासद असलेली बँक आहे आणि शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारचे कर्ज देता येत नाही. तर का म्हणुन या विषयास विरोध करावा जर संचालक एक चांगला शेतकऱ्यांकरीता निर्णय घेत आहे तर विरोध का? बहुतांश शेतकऱ्यांकडे किसान क्रेडीट कार्ड आहे. परंतू जर बँक स्मॉल फायनान्स बँक झाली तर प्रत्येक शेतकरी व सभासदाच्या खिश्यात नामको किसान क्रेडीट कार्ड असेल. त्यामुळे तुम्ही विचार करा तुमचा धंदा किती वाढेल. तुमच्याकडे फॉरेक्स नाही भारतामधील लिमिटेड बँकांमध्ये फॉरेक्स आहे. ते फक्त मुंबई स्थित आहे. जर तुम्ही स्मॉल फायनान्स बँकेत गेले तर तुम्हांला इतर राज्यात चांगला व्यवसाय करता येईल. तुमच्याकडे इनव्हेस्टर येतील

को–ऑप बँक असल्याने ते येत नाहीत. मोठया ठेवी येत नाही. तुम्हांला शंभर कोटींचे कर्ज वितरित करता येत नाही. त्यामुळे मोठे कर्जदार आपल्याकडे येत नाहीत. त्यामुळे सदर विषयास सर्वांनी मंजूरी दयावी. शेतकऱ्यांच्या वतीने आमचे अनुमोदन आहे.

त्यावर बंडूकाका बच्छाव यांनी संचालकांनी केलेल्या कामाचे कौतुक करून अभिनंदन केले व त्यांनी सांगितले की, काळानुसार विचार बदलतात, योजना बदलतात, दिशा बदलतात आणि बदलत असतांना आपण सुध्दा बदलले पाहिजे नाहीतर आपण मागे पडतो. एच.एम.टी.कंपनी ही जुनी होती परंतू तिने नविन मॉडल न आणल्यामुळे ती मागे पडली व नामशेष झाली. बदलत्या काळानुसार बऱ्याच कंपन्या हया बंद पडल्या. मला वाटते की, सभासदांच्या हिताला कुठलेही गालबोट न लागता जर बँकेची व्याप्ती वाढत असेल तर, नावलौकिक वाढणार असेल तर स्मॉल फायनान्स बँकेकडे जाण्यास हरकत नाही असे मला वाटते. इथे संचालक मंडळ जास्त पारदर्शक काम करत आहे. माझा दरवर्षी इनकम टॅक्स जातो तो पुरावा मी आणला आहे. परंतू बँकेच्या बारकाईच्या धोरणांमुळे मला कर्ज मंजूर झाले नाही. परंतू जर स्मॉल फायनान्स मध्ये गेल्याने जर शेतकरी, बँक व सभासद या सर्वांचा फायदा होणार तसेच ठेवीदार यांचा सुध्दा फायदा होणार असेल तर सदर मार्गाने जाण्यास हरकत नाही या विषयास आमची मंजूरी आहे.

नंतर एका सभासदाने सांगितले की, ज्यावेळी बँकेची निवडणूक झाली त्यावेळी वाटले होते की, बँक वाचेल की नाही. परंतू तत्कालीन अध्यक्ष श्री.सोहनलाल भंडारी यांनी जे कटू निर्णय घेतले त्यामुळे ही बँक वाचली. माझा या संचालक मंडळावर पुर्ण विश्वास आहे. त्यांनी मांडलेला स्मॉल फायनान्स बँकेचा प्रस्ताव सर्व सभासदांच्या वतीने मंजूरी देतो व पाठिंबा देतो.

त्यानंतर सभासद संदीप भवर यांनी अनेक बँकांचे उदाहरण देऊन व्यवस्थित अभ्यास करावा व आपली बँक स्मॉल फायनान्स बँक करू नये अशी भूमिका मांडली.

त्यानंतर सभासद कौशल वाखारकर यांनी आपली बँक ही सहकारातून निर्माण झालेली आहे व ती सहकारीच राहीली पाहिजे कारण शेतकऱ्यांच्या आपल्यावर विश्वास आहे. माझे घर या बँकेमुळे झाले इतर एचडीएफसी व आयसीआयसीआय यांनी मला कर्ज दिले नाही मात्र नामको बँकेमुळे माझे घर झाले. परंतू स्मॉल फायनान्स बँक झाल्यावर माझ्यासारख्यांचे स्वप्न पुर्ण होणार नाही व्याजदर जास्त असेल असे सांगितले.

त्यानंतर योगेश दायमा यांनी बँकेला मिळालेल्या पुरस्कारांबदद्ल अभिनंदन केले. त्यांनी नोकिया मोबाईलचे उदाहरण देऊन त्याने आपल्याला बदल न केल्याने नामशेष झाला त्यामुळे बदल हा प्रकृतीचा नियम आहे आणि ते आपण स्विकारले पाहिजे असे सांगत माझे आपण मांडलेल्या स्मॉल फायनान्स बँकेच्या प्रस्तावास सभासद या नात्याने समर्थन आहे असे सांगितले त्यावर सभासद गजानन शेलार यांनी बँकेला चार चार पुरस्कार मिळाले त्यामुळे आपण कुठेही कमी आहोत असे वाटत नाही. याचा अर्थ आपण सक्षम आहोत. तरी कुबडया का घ्यायच्या असा प्रश्न उपस्थित केला. ज्या पध्दतीने आपल्या पूर्वजांनी म्हणजे औरंगाबादकर, क्षत्रिय, जोशी, भवरीलाल मोदी, हुकुमचंद बागमार, धात्रक साो यांनी सदरची संस्था वाढविणे करीता रक्ताचे पाणी केले. बँकेने अनेक संस्थांना चांगल्या प्रकारे मदत केली. सध्या ज्याप्रकारे कर्ज प्रकरण मंजूर होण्यास अवधी लागतो त्याचा कालावधी बदला म्हणजे बँक अजुन मोठी होईल. नंतर बाकीचा विषय बघता येईल. सेवकांना प्रशिक्षित करा. सर्व संचालकांना जबाबदाऱ्या दया म्हणजे कामे सुरळित होतील. त्यांना २५ लाखापर्यंतचे कर्ज मंजूरीचे अधिकार दया. त्याकरीता सभा कशाला लागते. रोज मिटींग घ्या. दुसऱ्या बँका दणादण कर्ज देतात. बँकेच्या कर्ज पध्दतीमध्ये थोडे बदल करा. मी जेव्हा खाजगी बँकेकडे जाऊन अर्ज करतो तेव्हा ते शंभर ठिकाणी सहया घेतात कसल्या त्या मला माहित नाही. पण मला कर्ज घ्यावयाचे असते मी दणादण सहया करतो तसे आपल्याकडे करा ते सोडून स्मॉल बँकींगकडे का जाता. कॉसमॉस, शामराव विठ्ठल बँक सारख्या मोठया बँका आहे त्या या मार्गावर का जात नाही. मी विद्याधर अनासकर साो. बरोबर बोललो त्यावेळी त्यांनी सांगितले की, स्मॉल बँकींगमध्ये जाणे धोक्याचे आहे. खूप काही त्याने फायदा होईल असे

नाही. त्यातही रिझर्व्ह बँकेचे चे नियम लागणारच आहे. फक्त एवढे होईल की संचालक मंडळास वाटले तर ते आपल्या नातेवाईकांनाही कर्ज देतील. बंडूकाका आपण शेतकऱ्यांना कर्ज देऊ शकतो. द्राक्षबाग हा उद्योगामध्ये गेलेला आहे. स्मॉल बँकींग झाल्यामुळे खुप फायदे होतील ते साफ चुकीचे आहे. मी असे म्हणत नाही तुम्ही संचालक आहात तुम्हांला पुढे निवडणूकीला उभे राहता येत नसेल तर तुमच्या नातेवाईकांना उभे करा फोटो मात्र तुमचे लावा. आम्ही मतदान करू. कशाला जाता स्मॉल बँकींग मध्ये आहे ते ठेवा जे जुने आहे ते सोने आहे. या ठरावाला विरोध करायचा म्हणुन विरोध करत नाही. हे रोपटे तुम्ही वाढवू शकता. तुम्ही ठरवा फक्त विचार करण्याची गरज आहे. या बँकेने मला मोठे केले आहे हे मी विसरणार नाही. तुम्ही सुध्दा विसरू नका. या स्मॉल बँकींगच्या फंदयात पडू नका. हा विषय माघारी घ्या. विषय नामंजूर करून तुमचा अपमान करण्याची आमची इच्छा नाही. त्याकरीता १५ व १६ नंबरचा विषय माघारी घ्यावा. व आपली बँक कशी वाढेल ते बघावे. स्मॉल बँकींगमध्ये जायला आमचा १००% विरोधच आहे. हा विषय पाठीमागे घ्यावा ही विनंती करतो.

त्यानंतर अध्यक्ष श्री.हेमंत धात्रक यांनी उत्तर देतांना सांगितले की, सर्व सभासदांनी चर्चेत भाग घेऊन साधक बाधक चर्चा झाली. सर्व आपण रेकॉर्ड केले आहे. त्याप्रमाणे प्रोसेडींग केले जाईल याची कॉपी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व सेंन्ट्रल रजिस्ट्रार यांना ठरावासोबत पाठविली जाईल. परंतु कुठल्याही परिस्थितीत हा विषय आपण थांबविणार नाही. संचालक मंडळाने संपुर्ण अभ्यास करून बँकेसाठी हा निर्णय योग्य आहे म्हणुन घेण्याची ठरविले आहे. मी उपस्थित सभासदांना आवाहन करतो आपण सर्वांनी बहुमताने तो मंजूर करावा. प्रस्ताव आपण आहे तसेच पाठवून जर मंजूरी दिली तर योग्यच नाहीतर तो विषय थांबणार आहे. पण फक्त आपण विषय मागे घेतला व टाकला हा काही पोर खेळ नाही. मल्टिस्टेट को—ऑप बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. स्मॉल फायनान्स बँकेचे निकष हे को—ऑप पेक्षा जास्त कडक आहे पगार घेता येत नाही. नातेवाईकांना कर्ज देता येत नाही. एकदम नियम किचकट व क्लिष्ट आहे. हे व्यवहारे सोो तुम्हालाही कल्पना आहे. याकरीता मी सर्वांना आवाहन करतो की आवाजी मतदानाने या विषयास मंजूरी दयावी. त्यावर उपस्थित सभासदांपैकी जास्तीत जास्त सभासदांनी सदर विषयास मंजूरी दिली व काही सभासदांनी विरोध दर्शविला.

सुचक : श्री.घुगे प्रकाश दत्तु
अनुमोदक : श्री.जेजुरे भिमराव कोंडाजी
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१६. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या लघु वित्तीय बँक संक्रमण योजनेनुसार पब्लिक लि. कंपनी स्थापन करणे कामी निवडलेल्या प्रवर्तकांच्या नावांना मान्यता देणे.

ठराव क्र.१६ माहिती निरंक

विषय क्र.१७ ६७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला गैरहजर असलेल्या सभासदांची गैरहजेरी माफ करणेबाबत.

ठराव क्र.१७ माहिती निरंक

विषय क्र १८ मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

ठराव क्र १८ ज्या सभासदांनी प्रश्न विचारलेले आहे त्यांना उत्तरे देण्यात येतील. त्यानंतर राष्ट्रगीत होऊन सभेची सांगता झाली.

विश्राम दीक्षित
मुख्य कार्यकारी अधिकारी

हेमंत हरीभाऊ धात्रक
अध्यक्ष